2 6 MAR 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आदिवासी समाजामुळेच जंगलांचे संरक्षण | संपत देसाई; शिवाजी विद्यापीठात परिसंवाद

कोल्हापूर, ता. २५ : 'आदिवासी समाजच जंगलांचे जतन आणि संरक्षण करीत असून, नागर समाजामुळे त्याचे नुकसान होत आहे. आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी वनहक्क कायद्याची अंमलबजावणी होऊन सामूहिक वनहक्काचे दावे मंजूर होणे आवश्यक आहे,' असे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त आयोजित 'जंगल आणि आदिवासी समाज' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत, पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात परिसंवादात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संपत देसाई यांनी विचार मांडले. यावेळी नितीन माळी, उदय गायकवाड, श्रीकृष्ण महाजन, प्रकाश राऊत, आसावरी जाधव उपस्थित होते.

देसाई म्हणाले, 'आदिवासी समाज खऱ्या अर्थाने आधुनिक आहे. विकासाचे मोजमाप करताना प्रथम सर्व आदिवासी समाजाचे जगणे समजून घेणे आवश्यक आहे. या समाजाने प्रचंड निरीक्षणशक्तीच्या व पारंपरिक ज्ञानाच्या आधारे आपले जगणे समाधानाचे बनविले आहे.' श्री. गायकवाड म्हणाले, 'आदिवासी हे नागर संस्कृतीपासून दूर असलेले मूळ रहिवासी असून, आर्य आणि द्रवीड संस्कृतीच्याही अगोदर या देशात त्यांचे वास्तव्य आहे. त्यांच्याकडे हवामानाचा अचूक अंदाज वर्तविण्याचे ज्ञान आहे. या समाजाने जंगल, पर्यावरणाचे संरक्षण करण्याचे काम केले आहे.'

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, अमोल मिणचेकर, आदी उपस्थित होते. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. नितीन माळी यांनी आभार मानले.

**'आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाचा उपयोग व्हावा'**

डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, 'विद्यापीठातील संशोधन समाजापर्यंत पोहोचले पाहिजे. विकासाचे प्रत्येक पाऊल निसर्गाच्या विरुद्ध असते. चिरंतन विकास घडवून आणायचा असेल, तर आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे.'

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात सोमवारी 'कडेकोट'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागामार्फत मानव्यशास्त्र सभागृहात सोमवार, दि. २७ मार्चला दुपारी १२ वाजता 'कडेकोट कडेलोट' या ५५ मिनिटांच्या नाटकाचा प्रयोग आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी दिली. फ्रँका रामे (१९२९-२०१३) या लेखिकेच्या 'अ वूमन अलोन' या इटालियन नाटकाचे अमोल पाटील यांनी मराठी भाषांतर केले आहे.

लोकसत्ता

# आंतरराष्ट्रीय परिसंवादासाठी डॉ. चंद्रकांत लंगरे निमंत्रित

**कोल्हापूर :** अमेरिकेतील जेम्स मेडिसन विद्यापीठातील महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने प्रा. टेरी बाईटझल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'बाईटझल २०२३' परिसंवादासाठी विशेष साधनव्यक्ती म्हणून शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लंगरे यांना निमंत्रित केले आहे. ते 'महात्मा गांधी ऑन सेल्यूलॉईड' या विषयावर विचार मांडणार आहेत. यासाठी त्यांना जेम्स मॅडिसन विद्यापीठाकडून अनुदान मंजूर झाले आहे. डॉ. लंगरे यांनी यापूर्वी अमेरिका, इंग्लंड, इटली आणि पोलंड या देशांतील नामवंत विद्यापीठांत आपले शोधनिबंध सादर केले आहेत.



चंद्रकांत लंगरे

पुढारी

# 'कडेलोट कडेलोट' नाटकाचा प्रयोग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मानव्यशास्त्र विभागात सोमवारी (दि. २७) दुपारी बारा वा. कडेलोट कडेलोट हे नाटक सादर होणार आहे. इटालियन नाटक 'अ वूमन अलोन' याचे मराठी भाषांतर अमोल पाटील यांनी केले आहे. दिग्दर्शन कल्पेश समेळ यांचे आहे. सादरकर्ती प्रतीक्षा खासनीस आहेत, असे मेघा पानसरे यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठातील विद्यार्थिनी नाडगोडा हिची जपानमधील कंपनीत नियुक्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विद्यार्थिनी पूर्वा नाडगोडा हिची फुजित्सू लिमिटेड या जपानी कंपनीमध्ये नियुक्ती झाली आहे. ती कंपनीच्या कामाकरिता दोन वर्षांसाठी जपानमधील टोकियो येथे प्रस्थान करीत आहे.

पूर्वा नाडगोडा हिने विदेशी भाषा विभागामधून जपानी भाषेचा सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्स पूर्ण केला आहे. फुजित्सू ही जपानी माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान उपकरणे आणि सेवा देणारी बहुराष्ट्रीय कॉर्पोरेट कंपनी आहे. या कंपनीचे मुख्यालय टोकियो येथे आहे. ती वार्षिक कमाईनुसार जगातील सहाव्या क्रमांकाची सर्वात मोठी माहिती तंत्रज्ञान सेवा देते.

2 6 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**वारणानगर**
**प्रतिनिधी**

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.. खेळ, क्रीडा राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, गुणवत्तेमध्ये प्रत्येक वर्गातून महिल्या तीन क्रमांकाचे यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना जवळपास दीड लाखाहून अधिक रकमेची पारितोषिके, रोख रक्कम व भेटवस्तू स्वरूपाने प्रदान करण्यात आली. श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांनी खेळाडू आणि यशस्वी प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या गुणगौरवाबद्दल शुभेच्छा दिल्या.

समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलचे पंच, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) प्रा. डॉ. शरद बनसोडे आणि पेठवडगाव येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. मिलिंद हिरवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर होते.

प्रारंभी क्रीडा संचालक आण्णासो पाटील यांनी क्रीडाक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन अहवाल वाचन केले. खेळात राष्ट्रीयस्तरापर्यंत कार्य केलेल्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू आणि एक हजार रुपये देऊन सत्कार केला. १८ प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला. प्रा. सौ. संध्या साळुंखे, प्रा. सौ. सीमा काटकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शरद बनसोडे म्हणाले, वारणानगरी देशाला दिशा देणारे 'पॉवर हाऊस' आहे. डॉ. मिलिंद हिरवे म्हणाले, वारणेच्या माध्यमातून शिक्षण, समाजसेवा करण्याची उर्मी शिक्षण घेताना प्राप्त झाली.. त्याचीच जाणीव ठेवून गरजूंसाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. प्रा. डॉ. वासंती रासम म्हणाल्या, वारणानगरी नवीन शैक्षणिक धोरणाला सामोरे जाण्यासाठी तयार असून राष्ट्रीय छात्रसेना, एकात्मिक क्रीडा पदवी अभ्यासक्रमासारखे नवे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू करणे आवश्यक आहे. स्वागत प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी केले. आभार प्रा. क्रांतीकुमार पाटील यांनी मानले. यावेळी प्राचार्य एस. एन. शेख समन्वयक वैभव बुढ्ढे, प्रा. नितीन कळंत्रे, प्रा. एस. के. आतीरकर, प्रा. डी. ए. खोत, प्रबंधक लाडगावकर आदी उपस्थित होते.



**वारणानगर : येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात क्षितिज बेनाडे याला पारितोषिक प्रदान करताना प्रा. डॉ. शरद बनसोडे, डॉ. मिलिंद हिरवे, सोबत डॉ. वासंती रासम, प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, प्रा. अण्णासो पाटील व इतर सहकारी प्राध्यापक.**

तरुण भारत

# पर्यावरण रक्षणासाठी शाश्वत दृष्टिकोन गरजेचा




पन्हाळा : येथे देशभक्त आनंदराव नाईक कॉलेज मार्फत आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र माजी विभागप्रमुख डॉ. पी. एस. राऊत यांचा सत्कार करताना बाबासाहेब पवार. सोबत भूषण नाईक, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील व इतर.

- शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. एस. राऊत यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
पन्हाळा

जागतिक तापमानवाढीचा धोका लक्षात घेता पर्यावरण रक्षणासाठी शाश्वत विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून विचारमंथन होणे गरजेचे आहे. परिषदांमधून होणारे विचारमंथन समाजाच्या सर्व घटकापर्यंत पोहोचल्यास पर्यावरण रक्षणाची चळवळ उभी राहील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. एस. राऊत यांनी केले.

पन्हाळा येथे चिखली (ता. शिराळा) येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालयामार्फत आयोजित आंतरविद्याशाखीय शाश्वत पर्यावरण विकास या विषयावर आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी संस्था सचिव बाबासाहेब पवार होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी तर पाहुण्यांची ओळख डॉ. रेखा देवकर यांनी करुन दिली.

डॉ. राऊत म्हणाले, जागतिक पातळीवरचा विचार करता कार्बन उत्सर्जन आणि तापमानवाढ याने अख्ख्या जगाला ग्रासले आहे. वेळीच आपण या सर्व गोष्टीचा गांभीर्याने विचार केला नाही तर येणाऱ्या पिढ्या आपणाला माफ करणार नाहीत.

बाबासाहेब पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे विश्वस्त भूषण नाईक यांची उपस्थिती होती. परिषदेसाठी तज्ज मार्गदर्शक म्हणून मध्यप्रदेश येथील दिनेश कानडे, भोपाळ येथील डॉ. जया शर्मा, गोवा विद्यापीठाचे माजी विभाग प्रमुख डॉ. आनंद पाटील यांच्यासह राज्यभरातील सुमारे १५० संशोधक, प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत



# शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ तयारीला वेग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा १६ फेब्रुवारी रोजी होणारा ५९ वा दीक्षांत समारंभ स्थगित करण्यात आला होता. तो दीक्षांत समारंभ आता २९ मार्च रोजी दुपारी १२ वाजता राजमाता जिजाऊ हॉलमध्ये होणार आहे. या दीक्षांत समारंभाला आयआयटी कानपूरचे माजी संचालक पद्मश्री संजय धांडे प्रमुख पाहुणे आहेत. तसेच खासदार डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनाही नव्याने निमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाकडून पुन्हा नव्याने तयारीला वेग आला आहे. दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ प्रशासनाने ४२ कमिट्या स्थापन केल्या आहेत. या प्रत्येक समितीकडे कामांची जबाबदारी देण्यात आली आहे. दीक्षांत समारंभात १६५९४ प्रत्यक्ष तर ४९८६३ पोस्टाने अशा ६६४५७ पदवी प्रमाणपत्रे वितरीत केली जाणार आहेत. ३०० स्नातकांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात येणार असून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ४६ स्नातकांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात येईल. केंद्र शासनाच्या आदेशानुसार दीक्षांत समारंभाला कुलगुरू, प्र–कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा संचालक डीन आणि प्रमुख पाहुणे यांनी पांढरा पायजमा व कुर्ता तर महिलांनी मोती कलरची साडी त्यावर मोरपंखी कलरचे जॅकेट, गळ्यात मानवस्त्र परिधान करावयाचे आहे. परीक्षा भवन एक परिसरात प्रत्येक शाखेनुसार पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यासाठी स्टॉल उभारण्यात येणार आहेत. तर २८ मार्च रोजी ग्रंथदिंडी आणि ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन केले जाणार आहे. विद्यापीठात दीक्षांत समारंभाच्या कामाची जय्यत तयारी सुरू आहे.